# अर्थपूर्ण

जानेवारी २०१३।₹३०
पुणे, वर्ष ३, अंक ०१

**आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत**



# अर्थपूर्ण

**जानेवारी २०१३**
www.arthapurna.org

वर्ष तिसरे
अंक पहिला

वार्षिक वर्गणी
४०० रुपये

पुण्याबाहेरील धनादेश
४५० रुपये

धनादेश **‘अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि.’**/ Artahapurna Publications Pvt. Ltd. या नावाने काढावा.

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्,
नारायण पेठ, पुणे. ९८८१०९८०१०
**मुद्रितशोधन :** विजय जोशी

‘अर्थपूर्ण’मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**वितरण आणि जाहिरात**
हाऊस ऑफ सक्सेस,
१ पॅपिलॉन, कर्वे स्त्री शिक्षण संस्थेसमोर,कर्वेनगर,
पुणे-४११०५२
फोन ०२०-६४७०३६१५

संपादक
**यमाजी मालकर**
**संपादन साहाय्य : सम्राट शिरवळकर**
editor.arthapurna@gmail.com

**’अर्थपूर्ण’ पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१०४ निलगिरी अपार्टमेंटस्, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२०- ३२६००९९६**
arthapurna.monthly@gmail.com

## अनुक्रमणिका

०४ **...बळ देणारा क्रांतिकारी बदल ...!...** यमाजी मालकर

०६ **...बँक खात्यात थेट कॅश ... हे काय नवीन !...**दिवाकर लेले

१० **गेम चेंजर येत आहे हो!...**गिरीश गंगाधर धर्माधिकारी

१३ **‘रोख रक्कम हस्तांतर योजना’ : काही प्रश्न आणि चिन्ह..**किरण मोघे

१६ **महिलांची बँक-सर्वांची बँक...**उल्का दिलीप कुलकर्णी

१८ **तारांकित चलनी नोटा...**मीरा गिरीश धर्माधिकारी

२० **युद्धखोर ओबामा – नॉम चॉम्स्की...** सुहास सापटणेकर

२२ **खऱ्या उत्पन्नाची गुंतवणूक महत्त्वाची...**प्रसाद मिरासदार

२४ **जग इथले बुडले नाही...**रवींद्र तांबोळी

३० **नव्या वर्षात सामोरे जा नव्या बदलांना...**यशराज

३२ **शैक्षणिक कर्जः बँकांची सामाजिक बांधिलकी...**मिलिंद गड्डमवार

३४ **आपला विमा एजंट...**विजय तरवडे

३६ **चॅनलिंग थ्रू चॅनल...**वंदना धर्माधिकारी

३८ **हेजिंग म्हणजे काय ?...**संदीप भालचंद्र साठे

४० **दलाल स्ट्रीट : कपट आणि कारस्थान...**सुधीर राव



**पैसा झाला मोठा!**

**गुंतवणूक विशेष**

‘अर्थपूर्ण’ हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ६, राजप्रसाद, १०८ तुळशीबाग कॉलनी, पर्वती, पुणे-४११००९ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : यमाजी मालकर**

भूमिका

# देशाच्या तिजोरीत हात घालण्याचे बळ देणारा क्रांतिकारी बदल ...!




**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com


**देशातील बँकिंग वाढल्याशिवाय आपल्या देशात पारदर्शी व्यवहार होणार नाहीत, ते होणार नाहीत तोपर्यंत भ्रष्टाचार कमी होण्याची सुतराम शक्यता नाही आणि भ्रष्टाचार कमी होत नाही, तोपर्यंत आपल्या जीवनात खऱ्या अर्थाने सकारात्मक बदल होण्याचे कारण नाही. म्हणून सबसिडी थेट बँकेत जमा करण्याचा पुढाकार अनेक अर्थांनी क्रांतिकारी आहे.**

सबसिडी थेट बँकेत जमा करण्याच्या सरकारी पुढाकाराच्या स्वागताची आणि दुसरीकडे ती निवडणूक जिंकण्यासाठीची काँग्रेसची खेळी असल्याची चर्चा गेले काही दिवस सुरू आहे. गोंधळ काय झाला आहे, पहा. सरकारने काही चांगले केले तरी आपला त्यावर विश्वास राहिलेला नाही. कारण व्यवस्थेवर विसंबून राहावे, असे वातावरण आजूबाजूला दिसत नाही. बँकेत खाते उघडा आणि त्यात पैसा ठेवा किंवा आपलेच पैसे काढण्यासाठी त्रास सहन करा, यासाठी आपली तयारी नाही. मग प्रश्न असा पडतो की प्रशासन किंवा व्यवस्था चांगली व्हावी असे तर आपल्याला वाटते मात्र, त्यासाठी अगदी सुरवातीसच म्हणजे तिची घडी बसेपर्यंत होणारा त्रासही आपल्याला नको आहे.

एक गोष्ट स्पष्ट आहे. देशातील बँकिंग वाढल्याशिवाय आपल्या देशात पारदर्शी व्यवहार होणार नाहीत, ते होणार नाहीत तोपर्यंत भ्रष्टाचार कमी होण्याची सुतराम शक्यता नाही आणि भ्रष्टाचार कमी होत नाही, तोपर्यंत आपल्या जीवनात खऱ्या अर्थाने सकारात्मक बदल होण्याचे कारण नाही. अनेकांना हा बदल तांत्रिक वाटतो, पण मी त्याचे स्वागत यासाठी करतो की माणसांपेक्षा यंत्रांवरच विश्वास ठेवावा, अशीच आजची परिस्थिती आहे. अर्थात माणसे अशी म्हणजे इतकी अविश्वासार्ह का झाली, हा स्वतंत्र विषय आहे. आणि माणसे दोषी नसून व्यवस्था दोषी आहे, हे तर आपण क्षणोक्षणी पाहतो आहोत.

म्हणून हा पुढाकार अनेक अर्थांनी क्रांतिकारी आहे. ही व्यवस्था आपल्या देशात प्रस्थापित होईल, म्हणजे नेमके काय होईल पहा.

१. प्रशासन आणि सरकार भेदभावरहित असावे, असे प्रत्येक नागरिकाला वाटत असते. राजकीय आणि सत्तासंपत्तीच्या निकषावर होणारा भेदभाव मनात सतत सलत असतो. भारतीय माणसाच्या स्वप्नातील ती भेदभावरहित व्यवस्था निर्माण होण्याची ही मुहूर्तमेढ आहे.
२. चांगले प्रशासन याचा एक अर्थ ते पारदर्शी असले पाहिजे. आज ते नाही, मात्र बँकिंग आणि नव्या तंत्रज्ञानामुळे पारदर्शी व्यवहारांची वाट मोकळी होणार आहे.
३. आपल्या देशात आज ४५ टक्केच नागरिक बँकिंग करतात. याचा अर्थ ५५ टक्क्यांचा पैसा बँकिंग व्यवस्थेत येतच नाही. सबसिडीच्या माध्यमातून ते बँकिंग करायला सुरवात करतील. म्हणजे त्यांना गरज नसेल तेव्हा तो पैसा बँकांमध्ये राहील आणि देशाच्या पांढऱ्या अर्थव्यवस्थेत खेळत राहील. (राष्ट्रीय संपत्ती सडणार नाही. जसे १८ हजार टन सोन्याच्या रूपाने ती सडते आहे.)
४. आज सामाजिक सेवासुविधा मुजोर बनलेल्या राजकीय किंवा श्रीमंतांची कृपा म्हणून देण्याचा प्रयत्न केला जातो आणि गरजूंना लाचारी पत्करूनच घ्यावा लागतात. वास्तविक 'देशाच्या तिजोरी'त वाटा मिळणे, हा प्रत्येक नागरिकाचा

हक्कच आहे. हा हक्क सर्वसामान्य माणसाला समजणार आहे.

५. सबसिडीवर किंवा सामजिक योजनांवर एक रुपया खर्च पडतो तेव्हा थेट गरजूपर्यंत १५ पैसे पोचतात, असे राजीव गांधी म्हणाले होते. जे खरेच आहे. पण थेट त्या माणसापर्यंत पोचण्याची व्यवस्थाच निर्माण झाली नव्हती. त्यामुळे देशात गेल्या तीन दशकांत पैसा प्रचंड येऊनही त्या माणसापर्यंत तो पोचला नाही. त्याची क्रयशक्ती वाढली नाही. पण त्याच्या क्रयशक्तीवर आपली अर्थव्यवस्था अवलंबून असल्याने सध्या अर्थव्यवस्था जागची हलायला तयार नाही. आता त्याला क्रयशक्ती मिळणार असल्याने तिला गती येणार आहे.

६. पैशाला पैसा जोडून आपल्या बरोबरची माणसे कशी श्रीमंत होतात, हे आर्थिक निरक्षर असलेल्यांना लक्षातच येत नाही. या योजनेमुळे ते कळण्याची खिडकी किलकिली झाली आहे.

७. सबसिडी आणि सवलती घेण्यास पात्र नसलेले समूहही त्या घेत असल्याने सरकार सबसिडीच्या खर्चावर नियंत्रण ठेवू शकत नव्हते. आता ते नियंत्रण प्रस्थापित होईल आणि हे ओझे कमी झाल्याने वित्तीय तूट कमी होऊन विकासकामांवर अधिक खर्च करणे आणि अर्थव्यवस्थेची तब्येत बरी ठेवण्यास हातभार लागेल.

८. थेट बँकेतून सबसिडी ही एक चुणूक आहे. ही व्यवस्था देशाच्या व्यवस्थेवरील विश्वास वाढविणार असल्याने आपण देशाच्या मूळ प्रवाहात आहोत, ही जाणीव वाढीस लागेल. ज्यामुळे देशहिताचे, देशाच्या संपत्तीचे रक्षण करा, असे कोरडेपणाने सांगण्याची गरज पडणार नाही, तर देश आपला आहे, ही भावना खऱ्या अर्थाने वाढीस लागेल.




९. देशाला नुकसान पोचविणारे अतिरेकी आणि नक्षलवादी गटांचा प्रचार फिका पडेल आणि देशात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होईल.

१०. आर्थिक साक्षरतेला गती मिळाल्याने देश आणि समाजाला मागे ओढणारे भावनिक मुद्दे बाजूला पडतील आणि राजकीय पक्षांना आर्थिक किंवा मुलभूत प्रश्न नागरिक विचारू लागतील. अशा प्रश्नांमुळेच लोकशाही खऱ्या अर्थाने मजबूत होईल.

११. जगात दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजे १२१ कोटी लोकसंख्येच्या आणि प्रचंड वैविध्य असलेल्या देशाचा प्रचंड पसारा हा केवळ मनातल्या सुविचारांनी आणि देशप्रेमाच्या आणाभाकानी सांभाळता येणार नाही. अशा निरपेक्ष व्यवस्थेद्वारेच हा पसारा सांभाळला जाऊ शकतो.

'अर्थपूर्ण' च्या दिवाळी अंकाचे वाचकांनी स्वागत केले, त्यामुळे अर्थपूर्णच्या टीमला हुरूप आला आहे. अर्थपूर्ण चे अंक आपल्याला केवळ तणावरहित गुंतवणूक करण्यासाठी, देशाचे अर्थशास्त्र समजून घेण्यासाठी नव्हे, तर आपले आयुष्य अर्थपूर्ण करण्यासाठी उपयुक्त ठरतील, असे नियोजन आम्ही केले आहे. हा बदल आपल्याला आवडेल, याची खात्री आहे.

अंकाच्या या नव्या स्वरूपाविषयी आपल्याला काय वाटते, हे जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत. ■